स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**Office of the Controller of Examinations**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

संदर्भ: पनिका/२०१५-१६/४८३९ दि. ०७.०४.२०१६

प्रति,
**मा.प्राचार्य**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

<u>विषय:- उन्हाळी-२०१६ परीक्षेच्या उत्तरपुस्तिकांच्या मुल्यांकनाबाबत.</u>
संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र.पनिका/२०१५-१६/४७४७ दि.१८.०३.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०१६ पदवी परीक्षा सुरु झालेल्या आहेत. सदर परीक्षांचे प्रथम व द्वितीय वर्षाच्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन महाविद्यालयात व त्या उत्तरपुस्तिकांचे नियमन व तृतीय वर्षातील उत्तरपुस्तिकांचे परीक्षण व नियमन हे जिल्हा मुल्यांकन केंद्रावर सुरु झालेले आहे. परंतू परीक्षा विभागाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, काही महाविद्यालयांमध्ये मुल्यांकनाचे कार्य संथ गतीने चालू आहे. तसेच तृतीय वर्षाच्या मुल्यांकनासाठी प्राध्यापकांना कार्यमुक्त केलेले नाही.

सबब, आपणास पुन:श्च कळविण्यात येते की, या सर्व परीक्षांचे निकाल लवकरात लवकर जाहीर करण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयीन मुल्यांकन कार्यास गती द्यावी. तसेच केंद्रीय मुल्यांकन केंद्रावर नियमनाचे व तृतीय वर्षाच्या मुल्यांकन व नियमनाचे कार्य चालू असल्यामुळे याकामी आदेशप्राप्त प्राध्यापकांना त्वरीत कार्यमुक्त करुन तृतीय वर्षाचे निकाल जाहीर करण्यासाठी सहकार्य करावे. अशा प्राध्यापकांनी केंद्रीय मुल्यांकन केंद्रावर काम पूर्ण केल्यानंतर महाविद्यालयात रुजू होवून महाविद्यालयातील उर्वरित उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन करणे बंधनकारक राहील.

तसेच मुल्यांकन झालेल्या सर्व उत्तरपुस्तिकांचे गठ्ठे मोहरबंद करुन ठेवावे, जेणेकरुन विद्यापीठाचे वाहन आल्यानंतर त्याचे संकलन करणे सोईस्कर होईल. सबब, वरीलप्रमाणे कार्यवाही करुन मुल्यांकन कार्य पार पाडून निकाल लवकर जाहीर करणेसाठी सहकार्य करावे.

कळावे,

आपला

परीक्षा नियंत्रक